



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १९०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२० फेब्रुवारी २०२५

## थोडक्यात

### जिल्ह्यातील आरोग्यमित्र बेमुदत संपावर...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, ठाणे :** महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या आरोग्यमित्रांच्या मागण्याकडे सकरार दुर्लक्ष करत असल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व आरोग्य मित्रांनी बेमुदत संप पुकारला आहे. ठाणे जिल्ह्यातील आरोग्य मित्र देखील या संपात सहभागी झाले असून ठाणे शासकीय विश्राम गृहाबाहेर ते आंदोलनास बसले आहेत. राज्यात राबविण्यात येत असलेल्या महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन स्वरुपात भरण्यासाठी आरोग्य मित्र या पदासाठी भरती करण्यात आली होती. ज्या रुग्णालयात या योजना राबविल्या जातात त्या रुग्णालयात हे आरोग्य मित्र काम करत होते.

रुग्णाचा आलेला अर्ज आणि कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन पद्धतीने त्यांचा अर्ज संकेतस्थळावर समाविष्ट करण्याचे काम हे आरोग्यमित्र करतात. या आरोग्य मित्रांनी किमान वेतन आणि वार्षिक वेतनवाढ, आरोग्यमित्रांना ठरावीक संख्येने रजा मिळाव्यात, कायम स्वरूपी नोकरीचा दर्जा मिळावा आणि अन्य कामाच्या जबाबदाऱ्यांबाबत स्पष्ट धोरण आखावे अशा मागण्या सरकारकडे केल्या होत्या.

आरोग्यमित्रांनी या मागण्यांसाठी १२ फेब्रुवारीपासून संपावर जाण्याचा इशारा दिला होता. परंतू, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी मध्यस्थी करत १२ फेब्रुवारीला बैठक आयोजित केली. या बैठकीस डेप्युटी सीईओ विनोद बोंद्रे, तसेच सहाय्यक संस्था (टीपीए) पदाधिकारी आणि महाराष्ट्र आरोग्य मित्र कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. डी. एल.कराड यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# पुण्यात अवतरली शिवशाही, शिवछत्रपतींना मानवंदना

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, पुणे :** शिवजयंती महोत्सव समिती पुणेच्या वतीने लालमहाल येथून भव्यदिव्य मिरवणुक काढण्यात आली. यंदा या मिरवणुकीच १३ वं वर्ष आहे. जय शिवाजी जय भवानीचा जयघोष करत स्वराज्यातील सरदारांच्या घराण्यांच्या वंशजांच्या हस्ते लालमहालातील जिजाऊंच्या पुतळयाला पुष्पहार घालून जिजाऊ मॉसाहेब शहाजी महाराज शिवज्योत रथावरील शिवज्योत प्रज्वलन करून मिरवणुकीला सुरुवात झाली. फुलांची आकर्षक सजावट असलेला जिजाऊ मॉसाहेब शहाजी महाराज शिवज्योत, मुख्य स्वराज्यरथ, एकापाठोपाठ येणारे सरदारांचे,मावळ्यांचे, वीर मतांचे स्फुर्ती देणारे ९६ स्वराज्यरथ, महाराणी ताराराणी शौर्य पथकातील ५१ रणरागिणींच्या मर्दानी खेळांची




चित्तथरारक मानवंदना आणि ढोलताशा पथकाचं सुरेख वादन, तर सनई-चौघडयांचे मंगलमय सूर, तसेच हजारोंच्या संख्येने पारंपरिक पोशाखात उपस्थित महिला आणि शिवभक्त यांनी मिरवणुकीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या सोहळ्याचे उदघाटन श्रीमंत खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, सहकार आणि नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. तर भारताच्या इतिहासातील शिवकालीन युध्दकला सादर करणाऱ्या ५१ रणरागिणींच्या शौर्य पथकाने मर्दानी युध्दकला सादर केली.

नादब्रह्म ढोल ताशा पथकाच्या जल्लोषपूर्ण वादनाने वातावरण मंत्रमुग्ध झाले. यावेळी छत्रपती उदयनराजे भोसले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष आहेत. शिवाजी महाराजांचा ऐक्याचा विचार आजही पाहायला मिळत आहे. पुण्यात शिवजयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असून सर्व जाती धर्मांचे लोक एकत्र येत आहेत. यानिमित्ताने शिवरायांसोबत असलेले सरदार, मावळे यांचे स्मरण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# ९० हजार कैद्यांना मिळणार महाकुंभमेळ्यात स्नानाची संधी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, प्रयागराज :** उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमध्ये सुरू असलेला महाकुंभमेळ्याची येत्या काही दिवसांत सांगता होणार आहे. अशात उत्तर प्रदेशातील ७५ तुरुंगांमधील कैद्यांना विशेष पद्धतीने महाकुंभमेळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. उत्तर प्रदेश तुरुंग प्रशासन प्रयागराजच्या संगमातून पवित्र पाणी आणून सर्व तुरुंगांमध्ये कैद्यांच्या स्नानाची व्यवस्था करत आहे. उत्तर प्रदेशचे तुरुंग मंत्री दारा सिंह चौहान यांच्या कार्यालयाच्या माहितीनुसार, २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:३० ते १० या वेळेत सर्व तुरुंगांमध्ये हा विशेष कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. . राज्यभरातील तुरुंगांमध्ये एकूण ९० हजारांहून अधिक कैदी आहेत, ज्यामध्ये सात मध्यवर्ती कारागृहांचाही समावेश आहे.


**२१ फेब्रुवारी रोजी लखनौ तुरुंगात विशेष कार्यक्रम...**

याबाबत बोलताना कारागृह महासंचालक पी.व्ही. रामशास्त्री म्हणाले की, ही विशेष व्यवस्था तुरुंग मंत्र्यांच्या देखरेखीखाली केली जात आहे. संगमामधून आणलेले पवित्र पाणी तुरुंगातील लहान पाण्याच्या टाक्यांमध्ये भरले जाईल आणि नंतर ते कैद्यांच्या आंघोळीसाठी वापरले जाईल. २१ फेब्रुवारी रोजी लखनौ तुरुंगात होणाऱ्या कार्यक्रमात तुरुंग मंत्री दारा सिंह चौहान आणि वरिष्ठ तुरुंग अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

**यापूर्वी उन्नाव तुरुंगात कैद्यांसाठी स्नानाची सोय...**

यापूर्वी १७ फेब्रुवारी रोजी उन्नाव तुरुंगात कैद्यांसाठी अशाच प्रकारे स्नान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उन्नाव तुरुंगाचे अधीक्षक पंकज कुमार सिंह म्हणाले की, याचा बऱ्याच काळापासून विचार केला जात होता आणि आता २१ फेब्रुवारी रोजी कैद्यांना पुन्हा पवित्र संगमातील पाण्याने स्नान करण्याची संधी मिळणार आहे.

दरम्यान प्रयागराजमध्ये सुरू असलेला महाकुंभमेळ्याची २६ फेब्रुवारी रोजी सांगता होणार संपणार आहे. अशात तुरुंग प्रशासनाने तुरुंगातील कैद्यांनाही महाकुंभमेळ्यात वेगळ्या पद्धतीने सहभागी होण्याची संधी दिली आहे.



**महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी !**

दरम्यान यंदाचा महाकुंभमेळा विविध मुद्द्यांनी गाजला आहे. महाकुंभमेळ्या दरम्यान अनेक बऱ्या-वाईट घटनाही घडल्या आहेत. महाकुंभमेळा सुरू झाल्यापासून आतापर्यंत दोन वेळा चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या आहेत. २९ जानेवारी रोजी मौनी अमावस्येनिमित्त झालेल्या चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाला होता तर ६० जण जखमी झाले होते. यानंतर, १५ फेब्रुवारीच्या रात्री, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरही चेंगराचेंगरी झाली ज्यामध्ये १८ जणांचा मृत्यू झाला होता. गेल्या काही दिवसांत, महाकुंभाला जाणाऱ्या भाविकांच्या संख्येमुळे, अनेक ठिकाणी मोठी वाहतूक कोंडीही होत आहे.

# वाई पोलिसांची दमदार कामगिरी ! आरोपींना अवघ्या 3 तासात केले जेरबंद

**अक्षराज : दशरथ राऊत**

**दि.१९, खंडाळा :**

दि.१८/०२/२०२५ रोजी रात्रौ १२/३० वा ते ०२/३० वा चे दरम्यान बाभळवन सोनगिरवाडी वाई येथील मोकया जागेत एका तरुणाचा खुन झाल्याची प्राथमिक माहिती वाई पोलीसांना मिळाल्यानंतर तात्काळ घटनास्थळावर पोहचुन सदरची वाई पोलीस ठाणेचे प्रभारी परि. पोलीस उपअधिक्षक श्री श्याम पानेगावकर यांना दिल्यानंतर ते देखील घटनास्थळावर तात्काळ दाखल झाले असता मयताचे नाव राज अरुणकुमार सिंग वय २६ वर्षे सध्या रा साक्षी विहार वाई मुळ रा. बिहार असे असल्याचे निष्पन्न झाले. सदर ठिकाणी अधिकची चौकशी करता मयत व त्याचे मित्र हे सोनगिरवाडीमधील बाभळवन येथील मोकळ्या जागेत दारु पिण्यासाठी बसलेले असता मयत व त्याचे दोन मित्र प्रणित दिपक गायकवाड वय २५ वर्षे शाकीर शहाबुद्दीन खान दोघे राहणार आंबेडकर नगर यांचेमध्ये पार्टी करीत असतांना चेस्टा मस्करीचे वादातुन मयत राजसिंग यांस फुटलेल्या बियरच्या बॉटलने व लाकडी बांबुने डोक्यावर मारल्याने खुन केल्याचे




तपासात निष्पन्न झाले. त्यानंतर प्रभारी अधिकारी यांनी दोन पोलीस पथके तयार करुन त्यांस आरोपीचा शोध घेणेकामी रवाना झाले. वाहनावरुन परखंदी रोडने पळुन गेल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तपासपथकाने परखंदी घाटात सदर आरोपींचा शोध घेतला असता, ते दोघे परखंदी घाटातील डोंगरात लपुन बसल्याची माहिती मिळाली शिताफीने ताब्यात घेऊन त्यांस अटक करण्यात आलेली आहे.

अटक आरोंपीना मा. न्यायालयात समक्ष हजर केले असता, त्यांस पुढील तपास परि. पोलीस उपअधिक्षक श्री श्याम पानेगावकर हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक सो समिर शेख, मा. अप्पर पोलीस अधिक्षक सो वैशाली कडुकर मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो वाई विभाग बाळासाहेब भालचिम यांचे मार्गदर्शनाखाली वाई पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी परि. पोलीस उपअधिक्षक श्याम पानेगावकर, सहायक पोलीस निरीक्षक अमोल गवळी, पोलीस उपनिरीक्षक बिपीन चव्हाण, तपासपथकाचे पोलीस उपनिरीक्षक सुधीर वाळुंज, पोलीस उपनिरीक्षक अमित सुर्वे सहा पोलीस उपनिरीक्षक मुकुंद माळी, पो. हवा मदन वरखडे, धिरज यादव, अजित जाधव, पो.कॉ रुपेश जाधव, राम कोळेकर, गोरख दाभाडे, राम कोळी, नितीन कदम, प्रसाद दुदुस्कर, हेमंत शिंदे, विशाल येवले, धिरज नेवसे, सागर नेवसे, श्रावण राठोड, विशाल शिंदे, अक्षय नेवसे, ज्ञानेश्वरी भोसले, शितल कुदळे, स्नेहल सोनवणे यांनी केली असुन मा. पोलीस अधिक्षक समीर शेख व मा. अप्पर पोलीस अधिक्षक वैशाली कडुकर मॅडम यांनी वाई तपासपथकाचे अभिनंदन केले आहे.

# सातत्याने बदलत्या वातावरणामुळे मच्छीमारांची मासळीच्या दुष्काळाशी झुंज...



**दि.१९, उरण :** हवामानातील सातत्याने होणारे बदल, समुद्रातील वाढता मानवी हस्तक्षेप आणि जलप्रदूषणामुळे दिवसेंदिवस माशांचा साठा कमी होत चालला आहे. कधीकाळी राज्याच्या सागरी जलाधिक्षेत्रात मुबलक मत्स्यसंपदा होती. पण तिच्यावर उपजीविका करणारे लाखो मच्छीमार मागील काही वर्षांपासून मासळीच्या दुष्काळाशी झुंजत लागत आहेत. त्यामुळे मासळीच्या किरकोळ दरातही ३० टक्क्यांची वाढ झाल्याने खवय्यांच्या खिशालाही चाट बसत आहे.

अरबी समुद्र तसेच बंगालच्या उपसागरातील काही भागांमध्ये झिरो ऑक्सिजन झोन निर्माण झाले आहेत. त्यामुळे अशा भागांतून काही प्रजातींचे मासे इतरत्र स्थलांतरित होत आहेत. घोळ,जिताडा, शेवंड, बोंबील, मांदेली, कर्ली, कोळंबी, पापलेट, सुरमई तसेच खेकडे याचबरोबर इतर अनेक प्रजातींचे समुद्रातील अस्तित्व मागील काही वर्षांपासून कमी झाले आहे. बेकायदा पर्ससीन, एलईडी मासेमारीचा होणारा अतिरेक याचा मोठा परिणाम पारंपरिक मच्छीमारांच्या आर्थिक उत्पन्नावर झाला असल्याचे मच्छीमारांकडून सांगितले जात आहे. तसेच राज्याच्या सागरी हद्दीत घुसखोरी करून कोट्यवधींची मत्स्य संपदा हडप करणाऱ्या कर्नाटक, गुजरात राज्यांतील हायस्पीड ट्रॉलर्सनींही राज्यातील पारंपरिक मच्छीमारांचे जगणे कठीण करून टाकले आहे. समुद्रातील वाढते जलप्रदूषण, अनियंत्रित परराज्यांतील यांत्रिक तसेच यंत्रचलित मासेमारी नौकांवर प्रतिबंध घालाण्याची व अवैध पर्ससीन, एलईडी मासेमारीवरील बंदी केवळ कागदावरच राहिली आहे. मासळीची घटती उत्पादकता आणि नौकांची कमी होणारी संख्या यामुळे मासेमारी व्यवसायावर गंडांतर आले असल्याचे मच्छीमारांचे म्हणणे आहे.

सागरी मासेमारीला तर मुळातच अनेक मर्यादा आहेत. त्यातच समुद्रातील वाढत्या प्रदूषणामुळे अनेक प्रजातींचे मासे मोठ्या प्रमाणावर मृत्युमुखी पडत आहेत तर काही प्रजाती स्थलांतर करीत आहेत. जागतिक तापमान वाढीमुळेही माशांसह समुद्रातील एकंदरीतच जीवसृष्टीवरच अनिष्ट परिणाम होत आहे.

## मालमत्ता कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद वाढला

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, पनवेल :** महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने नागरिकांच्या मनातील शंकाचे निरसन प्रसिद्धी माध्यमातून करण्यात आल्यानंतर कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद वाढला आहे. गेल्या काही दिवसापासून कळंबोली, कामोठे, खारघर, पनवेल प्रभागातून एक कोटी हून अधिक थकित कर वसूल होत आहे. दरम्यान आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सुचनेनंतर उपायुक्त स्वरूप खारगे यांनी जप्तीपुर्व नोटीसानंतर सात दिवस दिवसांचा कालावधी पुर्ण होऊनही मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांना वॉरंट नोटीसा बजावण्यास सुरवात केली आहे.

आतापर्यंत पनवेल महानगर पालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे ४४७ जप्तीपूर्वीच्या नोटीसा व २७ वॉरंट नोटीसांचे वाटप थकबाकीदार मालमत्ता धारकांना दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनूसार जप्ती मोहीम अधिक तीव्र करण्याचा इशारा महापालिकेच्या वतीने देण्यात आला आहे. आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे. परंतू आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांना जप्ती नोटीसा दिल्या होत्या, अशा थकबाकीदारांकडून मालमत्ता कर वसुलीसाठी उपायुक्त स्वरूप खारगे व कर अधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली वसुली पथकाच्या माध्यमातून पनवेल, कामोठे खारघर तसेच कळंबोली थकबाकी दारांना जप्ती व अटकावणीची कारवाई करण्यात येत आहेत. याचाच परिणाम म्हणजे चारही प्रभागामधून सुमारे आजपर्यंत ३२८ कोटींचा भरणा झाला आहे.

# शून्यातून हिंदवी स्वराज्य उभारणारे 'छत्रपती शिवाजी महाराज' !

**छत्रपती शिवाजी महाराज हे या देशाचे अद्भुत आणि शाश्वत असे स्फूर्तीस्थान आहेत ! पाच पातशाह्यांशी शक्ती आणि युक्ती यांच्या सामर्थ्यावर लढा देऊन हिंदू शक्तीशाली मोगलांना आव्हान देऊ शकतात, हे छत्रपती शिवाजी महाराजांनी शक्य करून दाखवले !**

सर्व वीरांचे आदर्श स्थान असलेल्या शिवाजी महाराजांनी १६७४ मध्ये शेकडो वर्षांनंतर हिंदु धर्म आणि संस्कृती यांचा महाशक्तीशाली आणि बलाढ्य राजसत्तेचा भगवा झेंडा रायगडावर फडकवला ! छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेले हे हिंदवी स्वराज्य आणि त्याच्या स्थापनेची प्रक्रिया ही संपूर्णतःच एक दैवी प्रक्रिया होती. स्वाभिमानशून्य हिंदूंना लढण्याची प्रेरणा देणे आणि हिंदवी स्वराज्य स्थापनेची निर्मिती करणे ही एक बुद्धीगअगम्य घटनाच म्हणावी लागेल ! छत्रपती शिवरायांची भवानीमातेवर निःस्सीम श्रद्धा होती. त्यांच्या मुखात अखंड जगदंब जगदंब । असे उच्चारण असे. भवानीमातेने त्यांना प्रत्यक्ष दर्शन देऊन प्रसादरूपी भवानी तलवार प्रदान केली. या तलवारीच्या बळावर त्यांनी पुढे महापराक्रम गाजवून हिंदूंना छळणार्या मोगलरूपी दुर्जनांचा नाश केला !

वयाच्या १६ व्या वर्षी शिवरायांनी रायरेश्वरावरील शिवपिंडीवर रक्ताच्या धारेचा अभिषेक करून हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली होती. पुढे देव, देश आणि धर्म यांच्या रक्षणासाठी त्यांनी आपले सर्व आयुष्य वेचले. छत्रपतींच्या जीवनातील अफझलखानाचा वध, आग्याहून सुटका, सिंहगड जिंकणे आदी सार्याच एकापुढे एक घडणार्या वैशिष्ट्यपूर्ण घटना या कुठल्या दैवी चमत्कारांपेक्षा अल्प नव्हत्या ! त्यामुळे क्रूरकर्मा शत्रूही अवाक् झाला होता ! स्वतःच्या प्राणांची तमा न बाळगता त्यांनी मानवी रूपातील अनेक दैत्यांचे पारिपत्य केले. पुढे हिंदूंच्या रक्षणासाठी महाराजांनी स्वतःला विधिवत् राज्याभिषेक करवून घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापनेची घोषणा केली !



छत्रपती शिवाजी महाराजांचा हेतू हिंदवी स्वराज्य स्थापनेचा होता. तत्पूर्वी शेकडो वर्षे दक्षिण आणि उत्तर हिंदुस्थानात यवनी राजवटींनी हैदोस घातला होता. समर्थ रामदासस्वामींनी या परिस्थितीचे वर्णन करतांना म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुता दिसांचे माजले बंड ।, असे म्हटले आहे. यवनांचे आक्रमण उघड-उघड धर्मांध होते. त्यामुळे मोगल सत्ता उलथून श्रींचे राज्य स्थापन करणे हा छत्रपती शिवाजी महाराजांचा हेतू होता. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचे व्रत महाराजांनी श्रींची इच्छा म्हणूनच स्वीकारले होते. त्यासाठी आवश्यक अशा पराकोटीच्या त्यागाचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये धर्माचरणाने, भवानीमातेच्या उपासनेने आणि सद्गुरूंच्या कृपाशीर्वादाने निर्माण झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी पुरंदरच्या तहाच्या आडून सर्वोत्कृष्ट आणि धाडसी चाल आखली. तहानुसार त्यांनी औरंगजेबाला २३ किल्ले परत दिले. त्या कालावधीत महाराजांनी राजा जयसिंहास विजापूरच्या स्वारीवर साहाय्य करून विजय मिळवून दिला. त्यामुळे प्रसन्न होऊन औरंगजेबाने चर्चा करण्यासाठी महाराजांना आग्र्याला येण्याचे निमत्रंण दिले. या संधीचा लाभ उठवण्याचा धाडसी निर्णय महाराजांनी घेतला. वास्तविक स्वराज्याचा सर्वात मोठा शत्रू असलेल्या क्रूर औरंगजेबाच्या २ सहस्र कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर असलेल्या आग्र्यातील दरबारात स्वतःहून जाणे, म्हणजे वाघाच्या जबड्यात स्वतःहून हात घालण्यासारखे आहे, हे महाराज जाणून होते. तेथे आपल्याला धोका होणार, हेही यवनांची कूटनीती जाणणार्या महाराजांना ज्ञात होते; पण हिंदवी स्वराज्यासाठी पराकोटीच्या त्यागाची सिद्धता ठेवणार्या आणि ईश्वरावर निष्ठा असणार्या महाराजांनी ही संधी साधली. औरंगजेबाच्या दरबारात हिंदुस्थानातील अनेक हिंदु राजे आणि सरदार चाकरीला होते. मोगलांच्या सेवेमध्ये त्यांच्या अनेक पिढ्या खपल्या होत्या. अशा भरलेल्या दरबारात महाराजांनी प्रवेश केला आणि मी हिंदु राजा असतांना मला सरदारांच्या रांगेत उभे केले, असे म्हणून ते मोगल बादशहा औरंगजेबासमोर उभे राहून सर्वांसमोर त्याचा अपमान करून भर दरबारातून निघून गेले. त्यामुळे औरंगजेबाने महाराजांना अटक करून नजरकैदेत ठेवले आणि त्यांना ठार मारण्याची योजना आखली; मात्र महाराज अलौकिक साहस अन् बुद्धीमत्ता यांच्या क्षमतेवर औरंगजेबाचा कडेकोट बंदोबस्त तोडून पुन्हा स्वराज्यात सुखरूप परत आले. हे एखाद्या चमत्कारापेक्षा वेगळे नव्हते. महाराजांची हिंदूंचे तेज जागवण्याची मोहीम यशस्वी झाली होती. पुढे त्याचे परिणाम दिसणार होते.

छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून निसटल्यावर औरंगजेबाची विलक्षण बदनामी झाली. महाराजांच्या मुत्सद्देगिरीची आणि पराक्रमाची कीर्ती मात्र जगभर पसरली. महाराजांच्या या सुटकेने प्रेरणा घेऊन अनेक हिंदू मोगलांविरुद्ध उभे राहिले. आसाममधील लांच्छित बडफूकन हा त्यापैकीच एक वीर योद्धा मोगलांविरुद्ध लढला. औरंगजेबाचा सेनापती राजा जयसिंहाचा मुलगा राजा रामसिंग हा शिवाजी महाराजांचा हितचिंतक झाला. उत्तर हिंदुस्थानातून भूषणसारखे कवी आणि छत्रसाल बुंदेलासारखे वीर महाराजांच्या आश्रयाला आले. छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा येथील मोहीम ही हिंदवी स्वराज्य स्थापनेतील निर्णायक मोहीम ठरली. महाराज आग्र्याहून निसटल्यावर मोगल साम्राज्यास खरी उतरती कळा लागली. पुरंदरच्या तहात द्यावे लागलेले सर्व किल्ले आणि प्रदेश महाराजांनी पुन्हा जिंकून घेतले. महाराजांना अनेक हिंदू राजे आणि सरदार यांचे सहकार्य मिळू लागले. हिंदवी स्वराज्याचा विस्तार दक्षिणोत्तर अशा दोन्ही दिशांना होऊ लागला. औरंगजेबाचा हिंदु सरदारांवरील विश्वास उडाला आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी त्याला स्वतःला ५ लाखांच्या सैन्यानिशी दक्षिणेची मोहीम उघडावी लागली. आदिलशाही आणि निजामशाही त्याने १-२ दिवसांतच संपवली; मात्र स्वसामर्थ्याची जाणीव झालेल्या मराठ्यांनी त्याला जवळपास २५ वर्षे झुंजवले आणि शेवटी त्याचा याच हिंदवी स्वराज्यात मृत्यू झाला.

कवी भूषण म्हणतात, शिवाजी महाराजांनी वेदांचे, प्रसिद्ध पुराणांचे रक्षण केले. जिव्हेवर रामनाम ठेवले. हिंदूंची शेंडी राखली. शिपायांची रोटी राखली. खांद्यावरच्या जानव्याचे आणि गळ्यातल्या माळेचे रक्षण केले. मोगलांना थोपवले. बादशहाला धाक घातला. शत्रूंना चक्की पिसायला लावली. सीमांचे रक्षण केले. तलवारीच्या बळावर देव, देश आणि स्वधर्म यांचे रक्षण केले अन् या सर्वांतून हिंदूंच्या मनात जाज्वल्य प्रेरणाशक्ती निर्माण केली. (आधार - सनातन डॉट ऑर्ग)

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

### शेगाव..

गण गण गणात बोते
शेगांवी पाऊल वळते
गजाननाचे भेटीसाठी
अधीर मन पुढे पळते

गण गण गणात बोते
श्रीसमर्थ दर्शन घडते
राम शिव रूपे दोन्ही
जीवशीव मिलन होते

गण गण गणात बोते
विभूती भाळी लावते
आगळीअनुभूती येते
माझे मी पण गळते

गण गणगणात बोते
गात्र हे अहोरात्र गाते
अद्वैतब्रह्मसिध्दांताचे
अर्थ पूर्ण वस्त्र ध्याते

गणगण गणात बोते
विजय चरित्र वाचते
षड्रिपु पिडीत अंतरी
पुण्यमधुकण साचते

गण गण गणात बोते
चिंब होई स्तोत्रअमृते
अहर्निश नाम जिव्हे
जाणे महती उदाहृते

गण गण गणात बोते
प्रसादग्रहण रे आदृते
प्रमादाची जाण होते
वागलो कसे अनादृते

गण गण गणात बोते
कर्म मार्ग तो अनुमृते
न्हाहिलो अंतर्बाह्य रे
भाव भक्तीत चंद्रामृते

गण गण गणात बोते
भजन संपदा घटरिते
हे रूप असम सहस
गुण मायेसी अनावृते

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**


# शेगांव निवासी संत गजानन महाराज !

शेगाव निवासी संत श्री गजानन महाराज एक भक्त वत्सल संत म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या चमत्काराची महती सर्वश्रुत आहे. गजानन महाराजांचे जन्मस्थान हे बुलडाणा जिल्ह्यातील थळ हे आहे, असे सांगण्यात येते,मात्र अंगी वैराग्य वृत्ती,विरक्त भाव व मनात विश्व कल्याणाची भावना म्हणून सतत भटकंती करत असायचे. भटकंती करत असताना शेगांव येथे माघ वद्य ७ शके १८००, (२३ फेब्रुवारी १८७८) या दिवशी वयाच्या ३०व्या वर्षी देवीदास पातुरकरांच्या मठाबाहेर उष्ट्या पत्रावळीतील दिगंबर अवलिया अन्न भक्षण करतोय हे बंकटलाल अग्रवाल यांनी बघितले. त्यांच्या हळव्या व मायाळू स्वभावाला बघून रहावले नाही त्यांनी सकल वृत्तांत देविदास भाऊंना सांगितला व महाराजांना पंच पक्वान्नाचे ताट व पाणी दिले.महाराजांनी भोजन केले व पाणी पिऊन तृप्त झाले.यावरून माऊलीच्या जीवनकार्यातून संदेश असा की कष्टाने कमावलेले अन्न ताटात वाया घालवू नका.ते घर असो की सार्वजनिक कार्यक्रमातील असो.अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे याची शिकवण देतात.

संत गजानन माऊलींचे तेजस्वी रूप बघून माणसांची तेथे गर्दी झाली मात्र महाराज गर्दीतून अकस्मात निघून गेले. भक्त बंकट मात्र अस्वस्थ झाला. तो घडलेला सर्व वृत्तांत वडील भवानीरामांना सांगू लागला, मात्र त्यांचा विश्वास बसेना. महाराजांच्या दर्शनाने बंकट व्याकुळ झाला. व सततच्या ध्यासामुळे त्याने अन्न पाण्याचाही त्याग केला.शेवटी बंकटने एक वयोवृद्ध रामाजीपंत देशमुखांना वृत्तांत सांगितल्यावर ते म्हटले, बंकटा तू भाग्यवान आहेस. तुला योगी पुरुषाचे दर्शन झाले. तू त्यांचा शोध घे. नक्कीच तुझे कल्याण होईल.माऊलीच्या दर्शनाने व्याकुळ झालेला बंकट महाराजांना शोधण्यासाठी घर सोडून निघून गेला.चार दिवस घर सोडून गेल्यावर शेगाव मध्ये गोविंदबुवा हरिदासांचे नामसंकीर्तन कार्यक्रमाचा वृत्तांत एका पितांबर शिंपी यांनी बंकटला सांगितला,असता तो कार्यक्रमाच्या ठिकाणी आला. बंकटला तेजस्वी रूप संत गजानन महाराजांचे दर्शन झाले. दर्शनाने व्याकुळ झालेला बंकट महाराजांच्या चरणावर लोटांगण घालू लागला. भगवंतांचे दर्शन झाले असे बोलू लागला. महाराजांनी बंकटला चून (पिठलं)भाकरी असे जेवण आणावयास सांगितले. आजही अनेक संत गजानन महाराज संस्थानांमध्ये गुरुवारी पिठलं भाकरीचा नैवेद्य अर्पण करतात. महाराजांनी पिठलं भाकरी भक्षण केल्यावर, पितांबराला पिण्यासाठी पाणी आणावयास सांगितले. महाराजांनी आज्ञा केली की,नाल्यातून तांब्या बुडवून घेऊन ये. तो गोंधळाला, व विचार करू लागला कारण गुरांच्या जाण्या येण्यामुळे पाणी पूर्णतः खराब झाले होते. हे पाणी महाराजांना कसे प्यावयास द्यावं? मात्र महाराज बोलले मला दुसरे नको हेच पाणी हवं. तेव्हा मात्र गुरु आज्ञा म्हणून तो नाल्या जवळ गेला असता,सर्व पाणी त्याला नितळ व स्वच्छ दिसले. त्याने प्रसन्नतेने लोटा भरला आणि महाराजांना दिला. या प्रसंगातून महाराज आपणास संदेश देऊ इच्छितात की,पाणी हेच जीवन आहे. पाण्याचा योग्य वापर करावा.पाणी व्यर्थ वाया घालवू नका.

संत गजानन महाराज बंकटच्या घरी निवासस्थानी राहू लागले.त्यांचे चमत्कार बघून पंचक्रोशीत चर्चा झाली व दर्शनासाठी खेड्यापाड्यातील भक्त येऊ लागले. भाविकांची गर्दी वाढू लागली. यामध्ये एक गोसावी सुद्धा आला. एवढ्या गर्दीत दर्शन होणार नाही म्हणून अस्वस्थ झाला. त्याचबरोबर त्याचा महाराजांना प्रसाद म्हणून चिलम द्यायचा मानस होता. महाराजांनी त्याची व्याकुळता जाणली आणि त्याच्याकडून चिलम नैवद्य म्हणून स्वीकारली. यावरून संत गजानन महाराज भक्तांच्या मनातील भाव ओळखतात. म्हणून परमेश्वरावर निस्वार्थ,उत्कट प्रेम करा.शेगावात जानराव देशमुख आजाराने त्रस्त होता म्हणून घरातील अस्वस्थ झाले.त्यांनी बंकटसदनी येऊन महाराजांच्या चरणतीर्थांची मागणी केली.बंकटने चरण तिर्थ घेतले व जानरावांना पाजले तर, जानरावांची तब्येत ठीक झाली.त्याचबरोबर समर्थांचा एक दांभिक भक्त विठोबा माळी हा दांभिक भक्ती करून सर्वसामान्यांना लुबाडत असे. महाराजांनी त्यांचे भोंदूगिरी व दांभिक भक्तीचे सोंग उतरविले. अर्थात महाराज आपणास संदेश देऊ इच्छितात की अंधश्रद्धेला बळी पडू नका.दांभिक भक्तीच्या नांदी लागू नका. परमेश्वरावर निस्वार्थी भक्ती करा.बुवाबाजी करणाऱ्या भ्रष्ट साधूंच्या नादी लागू नका.

अक्षय तृतीयेच्या दिवशी संत गजानन माऊली बंकट सदनी बसलेले असताना, त्यांनी खेळणाऱ्या मुलाला जानकीराम सोनाराच्या घरी चिलम पेटवण्यासाठी विस्तव आणण्यास पाठवले. तर त्यांनी विस्तवास नकार देऊन मुलाला परत पाठविले व क्रोधाने बोलू लागला.स्वतःला योगी व महाराज समजतो तर,चिलम अग्नीवीना पेटवून दाखव.महाराजांनी बंकटला साधी काडी चिलमे समोर धरायला लावली व अग्नीविना चिलम पेटवून दाखविली. जानकीराम सोनारांच्या घरी अक्षय तृतीयेनिमित्त पंचपक्वानांचा स्वयंपाक चालू होता. स्वयंपाक झाल्यावर,जेवायला बसणार तेवढ्यात चिंचवणामध्ये आळ्या आढळून आल्या.जानकीरामाच्या लक्षात आले व तो महाराजांची क्षमा याचना करू लागला. त्या ठिकाणी जानकीरावांचा अहंकार नष्ट झाला व तो महाराजांचा निःस्सीम भक्त झाला.या प्रसंगातून व महाराजांच्या कार्यातून बोध असा की माणसाने अहंकारी असू नये.



संत गजानन महाराजांनी चंदू नामक भक्तांकडून त्यांच्या मातीच्या भांड्यांच्या उतरंडीमध्ये त्यांना ज्ञात नसलेले दोन कानवले ठेवले आहे.असा अद्भुत चमत्कार करून दाखवला. अर्थात भक्ताला त्यांनी भगवंत हृदयातच आहे, त्याला इतरत्र शोधू नका असा संदेश देतात.तीव्र उन्हामध्ये भास्कर पाटलाच्या कोरड्या विहिरीला पाण्याचे पाझर फोडले यावरून प्रेमाने व मायेने जगही जिंकता येऊ शकते. भक्तांच्या प्रेमापोटी महाराज मक्याचे कणसे खाण्यासाठी शेतात गेले असता,अग्नी पेटवल्यामुळे झाडावरील आगी मोहोळाच्या माशांमुळे सर्वजण पळू लागले. मात्र महाराज स्थितप्रज्ञ होते. त्यांच्या सर्व अंगाला मधमाशांनी चावा घेतला व शरीरातील काटे बघून लोक चिंतेत पडले.मात्र महाराजांनी दीर्घ श्वास घेऊन सर्वकाटे शरीराबाहेर काढले.यातून योगशक्ती व प्राणायामाचे महत्त्व महाराज आपणास समजावत आहेत. काही खोडकर मुलांनी महाराजांना उसाने मारण्याचा प्रयत्न केला असता,त्यांचे हात मारून थकून गेले मात्र, अंगावर एकही वळ उमटला नाही. याऊलट महाराजांनी त्यांच्याच हातातील ऊसाची मोळी घेऊन हातानेच ऊस पिरगाळून रस काढला. त्यांना पाजला. मुले शांत झाली. व महाराजांच्या चरणी नतमस्तक झाली.यावरून महाराजांच्या जीवन प्रवास व कार्यातून बोध असा की, नाहक कोणाला त्रास देऊन छळू नये.

संत गजानन महाराज द्वाड धोड्याच्या पायामध्ये झोपले. उनाड गाईला गरीब व शांत केले. अश्या अनेक प्रसंगातून भक्तांना शांतीचा संदेश दिला. महाराजांची गुरु आज्ञा पाळून पितांबर शिंपी कोडोली ग्रामामध्ये गेला. तेथे शेताच्या बांधावर एकांतात ओसाड जागेवर ध्यनास्थ बसून महाराजांचे नामस्मरण करू लागला.ग्रामस्थांनी त्याची परीक्षा घेण्याचे ठरवले.वाळलेल्या आंब्याच्या झाडाला पालवी फुटण्याची कठोर परीक्षा त्याने संत गजानन महाराजांचा धावा करून दिली. असा चमत्कार महाराजांच्या कृपेनें घडला. प्रत्यक्षात चमत्कार हा काही मुद्दाम किंवा प्रसिद्दीसाठी मुळीच नसतो तर समाजातील विचित्र, नास्तिका व अज्ञानी लोकांना धडा शिकवण्यासाठी असतो तर एका बाजूला भक्ताच्या परीक्षेसाठी सुद्धा असतो यातून परमेश्वरा प्रति असलेल्या अपारश्रद्धेचे दर्शन घडते.

सवडद येथील गंगाभारती हा कुष्ठरोगी महाराज ज्या ठिकाणी स्नानास बसायचे .तेथील माती आणून तिचे सर्वांगाला लेपण लावायचा. महाराजांनी त्याचा कुष्टरोग थुंकीने बरा केला. कदाचित आजच्या पिढीसाठीच काय तेव्हासुद्धा हा प्रकार किळसवाना वाटत असेल,मात्र यामध्ये एका अवलिया संत, महापुरुषाची दिव्यशक्ती होती. काहींच्या मते चमत्कार तर, काहींच्या मते रचलेली कथा, मात्र परमेश्वराला भक्ताच्या भक्ती व श्रद्धे पुढे नमाव लागतं. त्याच्यासाठी चमत्कार करावे लागतात. आणि हा काळ फार दूरचा नाही.केवळ शंभर ते सव्वासे वर्षा अगोदरचा आहे.लोकमान्य टिळकसारख्या चतुर व हुशार राजकारण्याला सुद्धा महाराजांच्या चमत्काराची व दिव्य दर्शनाची अनुभूती आहे.

अशाप्रकारे शेगावीचे महान संत गजानन महाराज यांच्या सकल जीवन प्रवासातून केवळ विश्व कल्याणाचा हेतू सिद्ध झालेला दिसून येतो. महाराजांनी त्यासाठी अनेक लीला व चमत्कार केले, मात्र कुठेही अंधश्रद्धा,जातिभेद, वाईट चालीरीती यांना वाव दिला नाही,याउलट वैज्ञानिक दृष्टिकोनासह भक्ती व अध्यात्माची जोड लावून,त्यावर कडाडून विरोध केला. कित्येकांच्या अहंकाराचा नाश केला. भक्तांना शांतीचा संदेश दिला.भक्तिमार्गातून त्यांना सत्कार्याची कास धरायला भाग पाडले. कित्येक गोरगरीब सामान्य माणसांचे कल्याण केले.महाराजांनी हयातीत व समाधीस्थ झाल्यानंतर सुद्धा अनेक चमत्कार व लीला करून कित्येकांचे दुःख निवारण केले, आजही करत आहे,म्हणून विदर्भाची पंढरी शेगाव या पवित्र तिर्थक्षेत्री भाविक दररोज हजारोंच्या संख्येने महाराजांच्या चरणी लीन होतात.

**महान संत श्री गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन ..!**
**गण गण गणात बोते...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जिल्हा बुलढाणा**
**मो.९७६३२८२०७७**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## राज्य अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्याच्या खर्चास मान्यता

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, ठाणे :** राज्यात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यास तसेच त्याकरिताच्या ३४६ पदांना व त्यासाठीच्या खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली आहे. या फोर्ससाठी आवश्यक असणारे ३४६ पदांच्या मनुष्यबळाचा प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. यापैकी ३१० पदे नियमित असतील तर ३६ पदे बाह्य यंत्रणेकडून भरली जाणार आहेत. नियमित पदे पुढीलप्रमाणे (पदनाम आणि संख्या) - विशेष पोलीस महानिरीक्षक- ०१, पोलीस उपमहानिरीक्षक ०१, पोलीस अधीक्षक- ०३, अपर पोलीस अधीक्षक-त०३, पोलीस अधीक्षक- १०, पोलीस निरीक्षक- १५, सहाय्यक पोलीस निरीक्षक- २०, सहा. पोलीस उपनिरीक्षक- ३५, पोलीस हवालदार- ४८, पोलीस शिपाई- ८३, चालक पोलीस हवालदार- १८, चालक पोलीस शिपाई- ३२, कार्यालय अधीक्षक- ०१, प्रमुख लिपीक- ०२, वरिष्ठ श्रेणी लिपीक- ११, कनिष्ठ श्रेणी लिपीक- स०७, उच्च श्रेणी लघुलेखक- ०२, निम्न श्रेणी लघुलेखक- ०३.

बाह्य यंत्रणेद्वारे भरावयाची पदे (पदनाम आणि संख्या या क्रमाने) वैज्ञानिक सहाय्यक- ०३, विधी अधिकारी- ०३, कार्यालयीन शिपाई- १८, सफाईगार- १२, एकूण- ३६. यासाठी येणाऱ्या आवर्ती खर्च रुपये १९ कोटी २४ लाख १८ हजार ३८० रुपये तर वाहन खरेदीसह अनावर्ती खर्चास ०३ कोटी १२ लाख ९८ हजार ३८० रुपये मान्यता देण्यात आली.

## वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका बिक्कड यांची एम.डी.भूलतज्ञसाठी निवड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, कळंब (धाराशिव) :** आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका बिक्कड यांची एम.डी. भूलतज्ञ शिक्षणासाठी शासकीय महाविद्यालय मिरज येथे निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

कळंब तालुक्यातील बहुला या मूळ गाव असलेल्या डॉ. प्रियंका बिक्कड या विद्यार्थी दशेपासून अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता, कष्ट , चिकाटी, नियोजन यांच्या बळावरती यशाचे शिखर गाठत एम.बी.बी. एस.चे शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय अधिकारी म्हणून वाशी तालुक्यातील पारा येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात एक वर्षापासून रुग्णांना सेवा देत आहेत.

त्यांच्या कार्यकाळात त्यांनी पारा व परिसरातील रुग्णांना योग्य उपचार दिल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची टक्केवारी वाढली आहे. त्यांनी आरोग्य केंद्रात कर्मचारी वाढवण्यासाठी प्रयत्न करून कर्मचारी वाढवून कर्मचाऱ्यांमध्ये वक्तशीरपणा निर्माण केला. त्यांच्यामुळे या आरोग्य केंद्रात प्रसूतीचा टक्का, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमाण वाढले होते.

## विंग घनकचरा प्रकल्प हा कौतुकास्पद - अनिल वाघमारे



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.१९, विंग (खंडाळा)** विंग ता.खंडाळा.जि.सातारा येथे कंपोस्ट प्लांटर चे पूर्ण किट चे वाटप अनिल वाघमारे (गट विकास अधिकारी वर्ग -१) यांच्या हस्ते ५ लाभार्थी कंपोस्ट प्लांटर चे पूर्ण किट चे वाटप आणि सेटअप करण्यात आला. तसेच संपूर्ण प्रकल्प बद्दल BDO साहेबांनी माहिती घेऊन सध्या सगळी कडे कचऱ्याचा मोठा प्रश्न मोठ्या प्रमाणात असून त्यासाठी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी उपयोजना करणे गरजेचे आहे. त्या साठी विंग ग्रामपंचायत नी ३१० घरी कंपोस्ट प्लांटर घनकचरा प्रकल्प सुरू केला आहे. हा प्रकल्प खूप चांगला आणि कमी खर्चिक आहे. तसेच या पासून होणारे खत हे शेतीसाठी उपयुक्त असे खत तयार होते. BDO साहेबांनी गावातील महिलांना प्रत्यक्ष भेट देऊन प्लास्टिक वेगळे करणे गरजेचे आहे. ओला व सुका कचरा वेगळा कसा करावा या घनकचरा बद्दल माहिती दिली व मार्गदर्शन केले. विंग गाव हे नेहमीच तालुक्यात सर्व योजना चांगल्या प्रकारे राबवत असतात . तसेच शासनाच्या प्रत्येक स्पर्धेत भाग घेतला जातो. विंग गाव हे एक नंबरचे काम करत असुन विंग गाव हे एक आदर्श गाव म्हणून ओळखले जाते. असे कौतुक BDO साहेबांनी केले. तसेच BDO साहेबांनी ग्रामपंचायत ऑफिस मध्ये प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेअंतर्गत जे पात्र लाभार्थी आहेत त्यांची मीटिंग घेऊन त्यांनाही चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाला खंडाळा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी वर्ग -१ अनिल वाघमारे, सरपंच स्वप्निल तळेकर, उपसरपंच पूनम तळेकर, सदस्य रोहिणी महांगरे, नितीन महांगरे, योगेश महांगरे दत्तात्रय मानकर, वंदना कदम, संगीता वाघ निता चव्हाण ग्रामसेवक लक्ष्मण पडळकर, प्रताप मुळीक इनोरा पुणे सर्व ग्रामस्थ व ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## खड्ड्याने घेतला ३ वर्षीय चिमुकल्याचा बळी

**दि.१९, अकोला :** वाशीम जिल्ह्याच्या कारंजा शहरात एक अत्यंत दुर्दैवी व हृदयद्रावक घटना समोर आली आहे. घरासमोर खेळताना एक तीन वर्षीय चिमुकला सात ते आठ फूट खड्ड्यात जाऊन पडला. त्या खड्ड्यातील पाण्यात बुडून चिमुकल्याचा अंत झाला. या घटनमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. कारंजा शहरातील समता नगरमधील रहिवासी मोहम्मद अरजान हा तीन वर्षीय चिमुकला घरातून बेपत्ता झाला होता. कुटुंबीयांनी परिसरात शोधाशोध केली. मात्र, तो दिसून आला नाही. सायंकाळी ७ वाजेपर्यंत सर्वत्र शोधूनही चिमुकला न आढळल्याने कुटुंबीय अस्वस्थ झाले. दरम्यान, परिसरातील एका व्यक्तीने मोहम्मद अरजानला घराजवळीच एका खड्ड्याजवळ खेळताना पाहिले होते. त्याने कुटुंबीयांना ही माहिती दिली. समोरील घराच्या बाजूला एक मोठा सात ते आठ फूट खोल खड्डा होता. त्या खड्ड्यात चिमुकला पडला असावा, असा अंदाज व्यक्त केल्या गेला. तो खड्डा पाण्याने भरला होता. जेसीबीच्या मदतीने खड्ड्यात साचलेले पाणी बाहेर काढण्यात आले. खड्ड्यातील पाणी ओसरताच तीन वर्षीय मोहम्मद अरजानचा मृतदेह देखील बाहेर आला. त्याला ताबडतोब शासकीय रुग्णालयात आणण्यात आले. उपस्थित डॉक्टरांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. हे कळताच कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला.

# विंचूरला शनैश्वर महाराज अखंड हरिनाम सप्ताह सुरु होणार..



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील श्री शनैश्वर महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रतिवर्षी म घ कृ.।। ७ ते माघ कृ. ।। १४ या कालावधीत शनैश्वर तेली पंच कमिटी, संताजी युवा प्रतिष्ठान व विंचूर ग्राम स्थांच्या वतीने शनैश्वर महाराज अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असते.

गुरुवार २० रोजी ह.भ.प. आसाराम महाराज बडे आळंदी शुक्रवार रोजी ह.भ. प. वेदान्ताचार्य सत्यवान महाराज लाटे (बीड) शनिवार रोजी ह.भ.प. यशवंत महाराज पाटील (ठाणे) रविवार रोजी ह.भ.प. पांडुरंग महाराज गिरी (वावीकर) सोमवार रोजी ह.भ.प. राजेंद्र महाराज सद्गिर (देवाची आळंदी) मंगळवार रोजी ह.भ.प. ईश्वर महाराज काळे (नाशिक) बुधवार रोजी ह.भ. प.रविंद्र महाराज (पिंपळगावकर) तर गुरुवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत कन्नड येथील शनिभक्त ह.भ.प. सुखदेव महाराज नेवपुरकर यांचे काल्याचे किर्तन व दुपारी १२ ते २ या वेळेत महाप्रसाद तसेच सायंकाळी कावड यात्रा व शनैश्वर महाराजांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

तसेच दररोज सकाळी ९ ते १२ या वेळेत आयोजित आरोग्य शिबिरांमध्ये गुरुवार दि. २० रोजी डॉ. रोहीत लौल याचे नेत्ररोग शिबिर, शुक्रवार दि. २१ रोजी डॉ. खुशाल जाधव यांचे मधुम ेह, उच्च रक्तदाब व छातीरोग शिबिर, शनिवार दि.२२ रोजी डॉ. सुरज देशमुख यांचे अस्थिरोग शिबिर, रविवार दि.२३ रोजी डॉ. नितीन चितळकर यांचे नाक, कान, घसारोग शिबिर, सोमवार दि. २४ रोजी डॉ. प्रियंका जाधव यांचे गुडघे दुखी, कंबरदुखी, आयुर्वेद व पंचकर्म शिबिर, मंगळवार दि. २५ रोजी डॉ. धनंजय दुबरकर यांचे मेंदुरोग शिबिर, बुधवार दि.२६ रोजी डॉ. चेतन जैन यांचे हृदयरोग शिबीर, तर गुरुवार दि. २७ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आयोजित केलेल्या किर्तनांच्या व आरोग्य शिबिरांचा विंचूर व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा. असे आवाहन शनैश्वर तेली पंच कमिटी व संताजी युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोदावरी खोऱ्यात बंधारे बांधण्यासाठी असलेली बंदी त्वरित उठवा - संतोष वाडेकर

### ११४ गावांमधील हजारो शेतकऱ्यांची एकजूट



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९,पारनेर (अहिल्यानगर) :** गोदावरी खोऱ्यात बंधारे बांधण्यासाठी बंदी असल्यामुळे पावसाळ्यात पडणारे पाणी सगळे वाहून जाते. त्यामुळे उन्हाळ्यात हाता तोंडाशी आलेले पिके सोडून देण्याची वेळ शेतकऱ्यावर येते.

त्यासाठी गोदावरी खोऱ्यात बंधारे बांधण्यासाठी असलेली बंदी उठून बंधारे बांधण्यासाठी परवानगी देण्यात यावी तसेच तांबडीकार धरण व वारणवाडी येथील शिपाई चोंडी बांधारा बांधण्यास परवानगी द्या अशी मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी म्हटले आहे. पारनेर तालुक्यातील भूमि पुत्र शेतकरी संघटनेने दुष्काळी गावांना हक्काचे पाणी मिळण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून विडा उचलला आहे. तसेच हक्काचे पाणी मिळण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटना व पारनेर तालुका पाणी संघर्ष समितीच्या वतीने संस्थापक संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली गाव तेथे कृती समिती अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाला अक्षरशः शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. आत पारनेर तालुक्यात वारणवाडी येथे भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने कृती समितीची स्थापना करण्यात आली. या आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी सरपंच संजय काशीद, भाऊसाहेब कोकाटे, अन्सार पटेल, महेंद्र काशीद, संजय भोर, विशाल कोकाटे,सचिन कोकाटे, चेअरमन संजय भोर,अशोक बेलकर, नानाभाऊ काशीद, पंडित गायके, बाबासाहेब काशीद, अक्षय गुंड, संतोष पानमंद, विशाल थोरात, मंजाबापू वाडेकर, पांडुरंग बेलकर, राहुल काशीद,विष्णू काशीद, पांडुरंग पानमंद, सुशील थोरात, राजेंद्र कोकाटे, जयसिंग काशीद, पाटील काशीद, जगदीश बेलकर, नवनाथ कराळे, अर्जुन कोकाटे, गणेश काशीद, विठ्ठल काशीद, पांडुरंग कोकाटे, अमोल पानमंद, विलास बेलकर, विश्वास थोरात, जनार्दन काशीद, उत्तम कोकाटे, विकास काशीद, किसन काशीद, ज्ञानेश्वर कोकाटे, विक्रम कोकाटे, निलेश काशीद, सतीश काशीद, तुषार गुंड, बाळू काशीद, गणपत चौधरी, अशोक काशीद, प्रवीण रोकडे, हरी कोकाटे, सुरेश बेलकर, पंढरीनाथ कोकाटे, बाबाजी काशीद, विष्णू बेलकर, धोंडीबा काशीद, विष्णू कोकाटे, सुरेश काशीद, संतोष काशीद, नवनाथ पानमंद, राजेंद्र गुंड, बबन कोकाटे, पोपट काशीद, बाळासाहेब गायके, तुषार काशीद, बाबाजी कोकाटे ,बबन थोरात, हनुमंत थोरात, लक्ष्मण चौधरी, विनोद काशीद उपस्थित होते.

# शालेय अभ्यासक्रमात छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास शिकवला जावा !



धर्मरक्षणासाठी मृत्यूलाही हसत कवटाळणारा छत्रपती संभाजी म हाराजांसारखा युगपुरुष महाराष्ट्राच्या इतिहासात ना कधी झाला आणि पुन्हा होणेही नाही. पाच पातशाह्यांना नेस्तनाबूत करून छत्रपती शिवाजी म हाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी स्वराज्याची पताका डौलत ठेवण्याची आणि स्वराज्याचे सर्वार्थाने रक्षण करण्याचे महत्कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनंतर संभाजी महाराजांनी समर्थपणे केले. म्हणूनच त्यांच्या नावापुढे 'स्वराज्यरक्षक' ही उपाधी लावली जाते. मध्यंतरी 'स्वराज्यरक्षक संभाजी महाराज' या मालिकेतून छत्रपती संभाजी महाराजांचा भीमपराक्रम जनतेसमोर आणला गेला; मात्र पुढे या मालिकेनेही इतिहासाची मोडतोड केल्याचा आरोप निर्मात्यांवर करण्यात आला. संभाजी महाराजांविषयी इतिहासकारांनी लिहिलेल्या उलट सुलट बाबींमुळे महाराजांविषयीचा खरा इतिहास सर्वसामान्य लोकांपर्यंत आजतागायत कधी पोहोचलाच नव्हता. महाराजांच्या सडेतोड वृत्तीमुळे म्हणा किंवा कर्म धर्म संयोगाने म्हणा, महाराजांचे अहित पाहणारे लोक दुर्दैवाने स्वराज्यातच निर्माण झाले होते. या सर्वांना छत्रपती संभाजी महाराज मात्र पुरून उरले. ज्या महाभागांनी स्वराज्याचे खाऊन स्वराज्याशी बेईम ानी केली त्यांच्याच पुढच्या पिढीच्या काही लोकांनी इतिहासकार बनून संभाजी महाराजांविषयी खोटेनाटे लिहून महाराजांना बदनाम करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. परिणामी एका असामान्य योध्याचा महापराक्रम अनेक पिढ्यांपासून झाकोळला गेला. ज्यामुळे आजपर्यंतच्या शालेय अभ्यासक्रमातही संभाजी महाराजांचा इतिहास थोडक्यात आटोपण्यात आला आहे. छावा चित्रपटाच्या माध्यम ातून छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात प्रभावीपणे पोहोचला आहे. याबद्दल चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. जाणकार इतिहासकारांच्या मते औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचा जो प्रत्यक्ष छळ केला त्यातील केवळ ५ टक्केच भाग छावा चित्रपटात दाखवण्यात आला आहे, तरीही दर्शकांच्या मनावर हा चित्रपट खोल परिणाम करून जातो. चित्रपटगृहातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक दर्शकाचे डोळे आज पाणावलेले असतात. काहीजण तर चित्रपटगृहातच ढसाढसा रडतात. हिंदू धर्मासाठी आणि स्वराज्यरक्षणासाठी शंभूराजांनी दिलेल्या बलिदानाची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. छावा चित्रपटाच्या माध्यमातून आजच्या पिढीसमोर छत्रपती संभाजी महाराजांचा मांडण्यात आलेला खरा इतिहास केवळ या पिढीपुरता सीमित राहून चालणार नाही. पुढच्या पिढीलाही तो कळला पाहिजे, यासाठी छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि बलिदानाचा सविस्तर इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा. त्याकरिता राज्याच्या शालेय शिक्षण मंडळाने पुढाकार घ्यावा !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# चिरली - टाकळी गावातील 'जलजीवन'चे अपूर्ण 'मिशन'



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, कुंडलवाडी :** चिरली-टाकळी गावातील जलजीवन मिशनचे काम अपूर्ण असतानाही कामाच्या खर्चाची उचल करण्यात आली आहे. अपूर्ण कामामुळे गावातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

वर्षभरापासून काम अपूर्ण ठेवणाऱ्या कंत्राटदार व शासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अन्यथा बेमुदत उपोषण करण्याचा इशारा चिरली-टाकळी येथील साहेबराव कांबळे यांनी जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे. चिरली-टाकळी येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामास २९ सप्टेंबर २०२१रोजी मान्यता मि ळाली.१६फेब्रुवारी २०२२ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. हे काम १कोटी ५२लाख ७हजार रुपयांचे आहे.

जलजीवन मिशन कामांतर्गत हर घर नल से जल ग्रामीण भागातील सर्वच कुटुंबाना वैयक्तिक नळ जोडणीद्वारे ५५लिटर प्रतिदिन प्रतिव्यक्ती पाणीपुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे. राज्यातील बहुतांश ग्रामीण पाणी पुरवठा योजना भुजलाधारित असल्यामुळे व सद्यस्थितीत राज्यातील पिण्याच्या पाण्याच्या समस्या लक्षात घेतल्यास ह्या मिळालेल्या योजनांचे कामे पूर्ण व्हायला पाहिजे होते. पण कालावधी पूर्ण होऊनही जल जीवन योजनेचे कामे पूर्ण न करताच अपूर्ण कामे करून संपूर्ण खर्च उचलला आहे. जलजीवन मि शनचे काम अपूर्ण राहिल्याने चिरली व टाकळी येथील ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. पाणी उशाला आणि कोरड घशाला अशी म्हणण्याची वेळ चिरली-टाकळी येथील नागरिकांवर आली आहे.

जल हे जीवन राहो या ना राहो परंतु, धन हे मिशन झालंच आहे असं वाटते. याच विचारातून यांना घाम फोडण्यासाठी कंत्राटदार आणि अधिकारी यांच्या मनमानीमुळे जलजीवन मिशनचे कामे अपूर्ण ठेवणाऱ्या कंत्राटदार व शासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच या जलजीवन कामाची चौकशी करण्यात यावी, अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा चिरली-टाकळी येथील नागरिक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक साहेबराव कांबळे यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

अक्षराज



# छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यावरील सर्व अतिक्रमणे काढणार – मुख्यमंत्री फडणवीस



**दि.१९, नारायणगाव :** छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यांचे संवर्धन झाले पाहिजे. शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरी सह स्वराज्याची राजधानी रायगड तसेच इतर किल्ल्यांवर संवर्धनाची कामे सुरू आहेत. छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यावरील सर्व अतिक्रमणे काढूण टाकण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यासाठी राज्य शासनाने स्पेशल टास्क फोर्स निर्माण केला आहे , कसल्याही प्रकारची अतिक्रमणे राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात येत आहे , असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजयंती सोहळ्यातील अभिवादन सभेत केले .

दरम्यान , छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित किल्ले हे आमच्याकरीता मंदिरापेक्षाही मोठे असून त्यांचे जतन आणि संवर्धनाचे काम राज्य शासनाच्या वतीने सातत्याने सुरु आहे , देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्यातील १२ गड किल्ले नामांकनासाठी निवडले आहेत. हे गडकिल्ले स्थापत्यशास्त्र, जलसंवर्धन, पर्यावरणशास्त्राचे उत्तम नमुना असल्याने पॅरिस येथील होणाऱ्या महासभेत येत्या आठवड्यात सादरीकरण करण्यात येणार आहे. हे गड किल्ले जागतिक वारसास्थळे होतील आणि जगातील लोक ते बघण्याकरीता येतील, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. किल्ले शिवनेरी येथे आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. या प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, बापूसाहेब पठारे, माजी आमदार अतुल बेनके, विघ्नहर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर, भाजपनेत्या आशाताई बुचके, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे, जुन्नर तालुका अध्यक्ष गणेश महाबरे, राजेंद्र कुंजीर, जिल्हा बँकेच्या संचालिका पूजा बुट्टे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, तहसीलदार सुनील शेळके आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, शिवनेरीच्या मातीमध्ये स्वराज्याचे तेज मिळते ते तेज घेऊन आम्ही महाराष्ट्राची सेवा करत आहोत. भारतातील राजांनी मुघलांचे मांडलीकत्व स्वीकारले होते. त्यांच्यापुढे नतमस्तक होत होते अशा काळात आई जिजाऊंनी शिवराय घडविले , मराठी मुलखात हिंदुस्थानात अनाचार ,अत्याचार चालला आहे ,या मुलखाला त्यातून बाहेर काढून स्वराज्याकडे नेण्याची जबाबदारी तुझी आहे असे सांगितले.

म्हणून शिवरायांनी तलवार हातात घेतली अठरापगड जातीच्या लोकांना एकत्रित केले ,मावळ्यांची फौज तयार केली व देव देश व धर्माची लढाई सुरू करून स्वराज्य स्थापन करण्याचे आत्माभिमान जागृत करण्याचे काम केले. येत्या ५ वर्षांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा ४०० वा शिवजन्मोत्सव साजरा करणार असल्याचे स्पष्ट करून राज्यशासना मार्फत शिवनेरी परिसरातील विकासकामे पूर्ण करण्यासाठी आम्ही कार्यरत राहू असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

# थोडक्यात

## नवी मुंबई मनपातील कंत्राटी कामगारांचा वेतन प्रश्न लवकरच मार्गी लागणार



**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**

**दि.१८, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत महापालिका आयुक्त स्तरावर समिती गठित करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल लवकर महानगरपालिकेकडे सादर केला जाणार आहे. नवी मुंबई महानगरपालिकेकडे ८ हजार कंत्राटी सफाई कामगार तसेच ठोक मानधन रोजंदारी तत्त्वावर काम करणाऱ्या १००८ कामगारांच्या वेतनाबाबत कामगार मंत्री यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक आयोजित करण्यात आली. या संदर्भात महापालिका आयुक्त यांनी कार्यवाही करून कंत्राटी कामगारांचा प्रश्न मार्गी लावावा असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले या समितीच्या अहवालानंतर कंत्राटी कामगारांच्या वेतनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावला जाईल असेही त्यांनी सांगितले असल्याने आयुक्तांनी कामगारांच्या वेतन प्रश्नावर सहानुभूतीने विचार करावा असे त्यांनी सांगितले या बैठकीस माजी खासदार तथा श्रमिक सेनेचे अध्यक्ष संजीव नाईक कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय ए कुंदन बालिका विभागाचे अधिकारी विविध कामगार संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## दिव्यांगांना स्वत: च्या पायावर उभे करणार - खा.लंके



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** दिव्यांगांना शासकीय मदत मिळवून देण्यापेक्षा ते स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजेत. प्रत्येक दिव्यांग हा कोणावर तरी अवलंबून असतो. आमच्या दिव्यांग प्रतिष्ठानची एकच इच्छा आहे की, दिव्यांग बांधव हा स्वतःच्या पायावर उभा राहिला पाहिजे. तो त्याच्या कुटूंबाचा कुटूंबप्रमुख झाला पाहिजे असा निर्धार खासदार नीलेश लंके यांनी केला. सीबी कोरा ग्रामोद्योग संस्था, सूक्ष्म, मध्यम व लघु मंत्रालयाचा खादी व ग्रामोद्योग आयोग व नीलेश लंके प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यामाने सोमवारी हंगा येथे दिव्यांग महारोजगार व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत खासदार नीलेश लंके यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील दिव्यांग बांधव मोठया संख्येने सहभागी झाले होते. यावेळी खादी ग्रामोद्योग संघ, जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी तसेच समाज कल्याण विभागाचे सहाययक आयुक्त उपस्थित होते. यावेळी बोलताना खा.लंके म्हणाले, दिव्यांगांसाठीच्या केंद्र व राज्य सरकारच्या योजना तसेच दिव्यांगांसाठी काम करणारे महामंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागांच्या योजनांची माहीती देत या योजनांचा लाभ दिव्यांगांना देण्याची ग्वाही दिली. काही अधिकाऱ्यांनी जागेवरच मंजुरी देत सकारात्मक भुमिका घेतली. त्याचा नगर दक्षिण मतदारसंघातील दिव्यांग बांधवांना निश्चितपणे होईल असा विश्वास खा.लंके यांनी यावेळी व्यक्त केला.

# जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तर्फे 'जाणता राजा' विषयावरील व्याख्यानाचे आयोजन



**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.१९, खडकवासला (पुणे) :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली, स्वराज्याचे रक्षण छत्रपती संभाजी महाराजांनी केले आणि त्याचे साम्राज्य श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी यांनी उभारले. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र म्हणजे पाचवा वेद आहे. आपल्या संस्कृतीतील चार वेदांप्रमाणे या वेदाचा देखील अभ्यास प्रत्येकाने करायला हवा, असे मत व्याख्याते पराग ठाकूर यांनी व्यक्त केले. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तर्फे शिवजयंतीनिमित्त 'जाणता राजा' याविषयावरील व्याख्यानाचे आयोजन संस्थेच्या सभागृहात करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर उपस्थित होते.

संस्थेतर्फे शिवजयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे देखील आयोजन करण्यात आले होते. पराग ठाकूर म्हणाले, आमच्या देव्हाऱ्यातील देव शिवरायांमुळे सुरक्षित राहिले. छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी किती असावी, हे आपल्याला पाहायला मिळते.

युद्ध हे लढण्यास आणि सरकार हे चालविण्यास असते, ते शिवरायांनी शिकविले. शिवरायांवर कोणीही टीका लिहून ठेवली नाही. परदेशी लेखकांनी देखील नाही. इतिहास वाचल्याशिवाय भविष्य घडणार नाही. देव देश, धर्म आणि स्वराज्याला सोन्याच्या सिंहासनावर बसविण्याकरिता शिवरायांनी कार्य केले.

ते पुढे म्हणाले, प्रत्येक युद्धात अग्रभागी असलेले राजे म्हणजे शिवाजी महाराज आहेत. शिवरायांचे चरित्र निष्कलंक आहे. त्यांच्यावर लोकांची श्रद्धा आहे. रयतेच्या मनातील स्वराज्य त्यांनी निर्माण केले. रयतेच्या भाजीच्या मिठाची काळजी घेणारे राजे हे शिवाजी महाराज होते, याबाबतची अनेक उदाहरणे इतिहासात सापडतात. नीतीवंत, न्यायवंत राजे म्हणून त्यांनी अनेक नवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती घेत आरमार, तोफा यांची उभारणी केली.

प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर म्हणाले, शिवरायांच्या जीवनातून आपल्याला प्रेरणा मिळेल, एवढी शक्ती त्यांच्या चरित्रात आहे. त्यांच्यातील काही गुण आपल्यामध्ये आहेत का? याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. समाज गुण्यागोविदानाने नांदायचा असेल, तर शिवरायांचे विचार अमलात यावे.

ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, छत्रपतींचे विचार आणि आचार आपल्या आयुष्यात घेणार आहोत का? हा विचार आपण करायला हवा. केवळ शिवरायांसारखी वेशभूषा करून मिरवणे म्हणजे शिवजयंती साजरे करणे नव्हे. केवळ मिरवणूक, फटाके यापर्यंत मर्यादित न राहता शिवरायांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचावे, याकरिता हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. आज जातीयवाद वाढलेला दिसतो. शिवरायांनी अठरा पगड जातीच्या लोकांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. त्याच महाराष्ट्रात हा जातीयवाद सुरु आहे, हे दुर्दैवी आहे.

## लहुजी शक्ती सेनेचे ना.शिवेंद्रराजेंना महाअधिवेशनासाठी निमंत्रण



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१९, खंडाळा (सातारा) :** लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य आयोजित मातंग समाज महाअधिवेशन देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, ना.एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व अजितदादा पवार उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये व विष्णू भाऊ कसबे संस्थापक अध्यक्ष यांचे नेतृत्वाखाली व प्रदेशाध्यक्ष कैलास दादा खंदारे व युवा नेते आशिष भाऊ कसबे यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक ०१ मार्च २०२५ रोजी पुणे येथे होत असलेल्या महाअधिवेशनाचे निमंत्रण ना.शिवेंद्रराजे भोसले सार्वजनिक बांधकाम मंत्री महाराष्ट्र राज्य यांना बाळासाहेब जाधव जिल्हाध्यक्ष, लहुजी शक्ती सेना सातारा यांचा नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने दिले.

ना.शिवेंद्रराजे भोसले यांना कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची विनंती केली असता मंत्री महोदयांनी संघटनेला व मातंग समाजाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी खेड गटाचे युवा नेते कांतीलाल कांबळे उपसरपंच खेड, श्रीकांत उर्फ पप्पू कांबळे शहरप्रमुख, सचिन कांबळे कार्याध्यक्ष, रामभाऊ पाटोळे संपर्कप्रमुख, राजेंद्र सकटे सातारा तालुका अध्यक्ष, कैलास भिसे खंडाळा तालुका अध्यक्ष, मोहन खुडे जावली तालुका अध्यक्ष इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने ना.शिवेंद्रराजे भोसले यांचा सत्कार बाळासाहेब जाधव जिल्हाध्यक्ष यांचे हस्ते करण्यात आला.

त्यानंतर अधिवेशन पोस्टरचे अनावरण करण्यात आले. यावेळी बाळासाहेब जाधव जिल्हाध्यक्ष, लहुजी शक्ती सेना अलका बोभाटे जिल्हाध्यक्ष महिला आघाडी, सदस्या पंचायत समिती सातारा, शोभा बाळासाहेब जाधव सदस्या पंचायत समिती खंडाळा यांनी आवाहन करताना सांगितले की, दशभूजा मैदान सहकारनगर पुणे या ठिकाणी ४० वर्षानंतर होणारे ऐतिहासीक असे मातंग समाजाचे महाअधिवेशन मातंग समाजाच्या विविध मागण्या शासनाकडून मान्य करून घेण्यासाठी आणि आपल्या भावी पिढीसाठी मातंग समाजातील महिला युवक यांच्या कल्याणासाठी महत्वाचे असल्याने मातंग समाजातील सर्वांनी १ मार्च रोजी या महाअधिवेशनासाठी आवर्जून उपस्थित रहावे व महाअधिवेशन यशस्वी करावे असे आवाहन लहुजी शक्ती सेना सातारा जिल्हा यांचे वतीने करण्यात येत आहे.

# समृद्ध शिर्डीसाठी शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहू - डॉ.सुजय विखे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, शिर्डी (अहिल्यानगर) :** शिर्डीमध्ये नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी घटनेत निष्पाप नागरिकांनी आपले प्राण गमावले. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये. यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागावे. शिर्डीतील माता-भगिनी सुरक्षित राहाव्यात आणि समृद्ध शिर्डी घडवण्यासाठी विखे पाटील परिवार सातत्याने प्रयत्नशील राहील, असे प्रतिपादन डॉ.सुजय विखे पाटील यांनी छत्रपती शासनाच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात केले. यावेळी छत्रपती शासनाच्या वतीने घटनेतील मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्यांच्या कुटुंबियांना सात लाख रुपयांचे धनादेश प्रदान करण्यात आले. तसेच शिर्डीतील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या ३०० कुटुंबांना घरगुती आवश्यक वस्तूंचे वाटपही करण्यात आले. विखे पाटील परिवाराच्या वतीनेही तिन्ही कुटुंबांना ७ लाख रुपयांची मदत देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

शिर्डीत शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी यावेळी ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. ग्रामस्थांनी एकमुखाने अनिष्ट प्रवृत्तींचा विरोध करण्याचा आणि समाजहिताचे निर्णय घेण्यासाठी एकोप्याने राहण्याचा निर्धार केला. याबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांनी ग्रामस्थांचे आभार मानले. शिडीच्या विकासासाठी पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून शिर्डी बस स्थानकाच्या समोर शिवसृष्टी उभारण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. तसेच शिर्डी सुरक्षित राहावी आणि चुकीची कृत्ये करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी पोलिसांनी सहकार्य करावे, असे आवाहन ही त्यांनी केले. साईबाबा संस्थानच्या टोकन प्रणालीबद्दल समाधान व्यक्त करताना त्यांनी यामुळे मंदिर परिसरात दररोज १०,००० लोकांची गद कमी झाल्याचे सांगितले. मात्र हे १०,००० लोक कोण होते? याबाबत त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शिर्डीच्या सुरक्षिततेसाठी आणि भक्तांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील. कोणीही अन्यायग्रस्त झाल्यास विखे पाटील परिवार त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील. समाजहितासाठी सत्य बोलायचे असेल, तर त्यासाठी कोणताही विरोध पत्करण्यास आम्ही तयार आहोत, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

# खा.लंके यांची केंद्रीय ऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागातील घरगुती ग्राहकांना २४ तास वीज मिळावी यासाठी गेल्या दोन वर्षांपासून राबविण्यात येत असलेल्या आरडीएसएस सिंगल फेज योजनेचे काम पुर्ण करण्यात होत असलेल्या दिरंगाईसंदर्भात खा.नीलेश लंके यांनी गेल्या आठवडयात ऊर्जा समितीच्या बैठकीत प्रश्न उपस्थित करताना केंद्रीय ऊर्जा समितीच्या अधिकाऱ्यांनी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाकडे धाव घेत या योजनेच्या कामाचा आढावा घेतला.

केंद्रीय उर्जा समितीचे सदस्य असलेल्या खासदार नीलेश लंके यांनी समितीच्या बैठकीत सिंगल फेज योजना व एकूणच महावितरणच्या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबाबात प्रश्न उपस्थित करत तिव्र शब्दात नाराजी व्यक्त केली होती. खा.लंके यांच्या नाराजीची तात्काळ दखल घेत केंद्रीय ऊर्जा विभागाचे वरीष्ठ अधिकारी नगरमध्ये दाखल झाले.

महावितरणच्या जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांना घेऊन ते पारनेरमध्ये दाखल झाले. खा. नीलेश लंके यांच्यासमवेत बैठक घेत विशेषतः सिंगल फेज योजनेसंदर्भात आढावा घेण्यात आला.

या प्रश्नासंदर्भात दिल्ली येथे सबंधित ठेकेदाराच्या उपस्थितीत बैठक घेण्यात येऊन ठोस निर्णय घेण्याची ग्वाही केंद्रीय ऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. केंद्रीय ऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांना अधीक्षक अभियंता रमेश पवार, अधीक्षक अभियंता आराखडा श्री ढोबळे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, उपभियंता हतोळकर यांच्यासह दिल्लीच्या पॉवर फायनान्स कार्पोरेशनचे अधिकारी ही यावेळी उपस्थित होते.